केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या वेगवेगळया योजनांकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन.
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८ /प्र.क्र.०५ /कार्या.०६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख: - १८ मार्च, २०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारचे पत्र क्र.जी-२७०१८/०१/२०१८-NHM-F-(E) दि.७.०१.२०१९
३) सार्वजनिक आरोग्य विभागाची नस्ती क्र. एनएचएम- ०९१८/प्र. क्र.४४०/आ-०७.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५ मधील २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य- ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना या शिर्षाखाली राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत योजना व कार्यक्रम याकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून वाचा क्र. २ अन्वये प्राप्त झालेला रू.५४.०० लाख (अक्षरी रुपये चौपन्न लाख फक्त) इतका निधी प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे..

(रू. लाखात)

अ.क्र.	योजनेचे नांव	लेखाशिर्ष (केंद्र हिस्सा)	सन २०१८-१९ ची अर्थसंकल्पिय तरतूद	वितरीत करावयाची रक्कम.
१	राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम.	२२१० F७६५	७२.६१	३०.००
२	एकात्मिकृत रोग सर्वेक्षण प्रकल्प	२२१० F७७४	२५.७१	२४.००
एकूण -:				**५४.००**

२. प्रकरणी विभागप्रमुख /नियंत्रण अधिकारी यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. १०४ /अर्थोपाय, दि. १.०३.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत असून वरील शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची सार्वजनिक आरोग्य विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१६१२४२२५२०२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.18 19:01:48 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र राज्य,मुंबई.
४) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६) महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७) विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
८) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य-७), मंत्रालय, मुंबई
१२) कार्यासन अधिकारी (का. ८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.